# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

माहितीचा अधिकार

## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

**क्र. मुमाआ/नों.क्र.७६५४/२१/अ.क्र.१२८८/२५/०१**

**श्री. ओमप्रकाश सगरामजी बालोटीया**
रुम नं,१/१०३ .जि .ए . साई बाबा नगर समाज मंदिर हॉलच्या मागे,
ठक्कर बाप्पा कॉलोनी एम/प. चेंबूर, मुबई-४०००७१

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ व का) एम/पश्चिम विभाग**
बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक आयुक्त
एम/पश्चिम विभाग यांचे कार्यालय, शरदभाऊ आचार्य मार्ग,
चेंबूर, मुंबई ४०० ०७१

**प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (इ व का) एम/पश्चिम विभाग**
बृहन्मुंबई महानगरपालिका, सहाय्यक आयुक्त
एम/पश्चिम विभाग यांचे कार्यालय, शरदभाऊ आचार्य मार्ग,
चेंबूर, मुंबई ४०० ०७१

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १८.०६.२०२५**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | अनुपस्थित. |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपीलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| १५.०३.२०२१ | २३.०४.२०२१ | १९.०४.२०२१ | १८.०६.२०२१ |

अपीलार्थी यांनी माहितीच्या अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.१५.०३.२०२१ रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी "बृहन्मुंबई पालिकेच्या एमपी वॉर्डामधील प्रभाग १५१ येथे १३ ऑगस्ट रोजी एक चार मजली इमारत कोसळून चौघांचा जीव गेला. सदर अनधिकृत बांधकाम करणाऱ्या आणि त्या अनधिकृत बांधकामाला आशीर्वाद देणाऱ्या अभियंता आणि अतिक्रमण विभागाचे अधिकारी आणि कर्मचाऱ्या विरूद्ध जे कारवाही करण्यात आली आहे. आणि अतिक्रमण विभागाचे त्याची संपूर्ण माहिती उपलब्ध करून द्यावी" माहितीची मागणी केलेली आहे.

सदर माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी दि.२३.०४.२०२१ रोजी "जोडपत्र अ मध्ये नमूद केलेली माहिती ही महानगरपालिकेच्या removalofencroachment.mcgm.gov.in या अधिकृत

संकेतस्थळावर उपलब्ध असुन संकेतस्थळावरुन विषयांकित माहिती उपलब्ध करून घ्यावी", असे उत्तरान्वये कळविले आहे.

अपीलार्थी यांनी दि.१९.०४.२०२१ रोजी कलम १९(१) नुसार प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे "माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिली नाही", असे कारण नमूद करुन प्रथम अपील अर्ज दाखल केला आहे. त्यावर दि.१८.०६.२०२१ रोजी "उपरोक्त बाबीस अनुसरून असे निदर्शनास येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्ता यांना त्यांच्या अर्जास अनुसरुन दिलेले उत्तर योग्य असून सदर उत्तराची प्रत अपिलकर्ता यांना सुनावणीनंतर लगेचच देण्याचे ओदश जन माहिती अधिकारी यांना देण्यात आले. जन माहिती अधिकारी यांनी कळविल्याप्रमाणे अपिलकर्ता यांनी म.न.पा. च्या संकेतस्थळावरून माहिती प्राप्त करुन घ्यावी. त्यांनी विचारणा केलेल्या माहिती संदर्भातील कारवाईची कागदपत्रे या काया्रलयाकडे उपलब्ध नसल्याचे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे योग्य असून याबाबतची पुढील चौकशी अपिलकर्ता यांनी संबंधित पोलीस स्टेशनमध्ये करावी" असे आदेश पारित करुन प्रथम अपिल निकाली काढण्यात आले.

अपीलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) नुसार आयोगाकडे दि.०५.०७.२०२१ रोजी "माहिती अर्धवट, अपूर्ण आणि चुकीच्या माहितीची छायांकित प्रत देण्यात आली", असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

सदर द्वितीय अपीलावर आज दि.१८.०६.२०२५ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान अपीलार्थी यांना सुनावणी नोटीस प्राप्त झाली असून कोणतीही पूर्व सूचना न देता अनुपस्थित आहे. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ व का) एम/पश्चिम विभाग, श्री. प्रियांक वावळे उपस्थित आहे. विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी कार्यकारी अभियंता पदनिर्देशित अधिकारी (इ व का) एम/पश्चिम विभाग अनुपस्थित आहे.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, प्रस्तुत प्रकरणी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ व का) एम/पश्चिम विभाग यांनी दिलेल्या प्रतिसाद व प्रथम अपीलीय अधिकारी कार्यकारी अभियंता पदनिर्देशित अधिकारी (इ व का) एम/पश्चिम विभाग यांनी पारित केलेले आदेश हे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील तरतुदींशी सुसंगत असून सदर प्रकरणातील महानगरपालिकेच्या अभिलेखावर उपलब्ध असणारी माहिती महानगरपालिकेच्या अधिकृत संकेत स्थळावर या आधीच उघड करण्यात आली असून प्रत्यक्षात झालेल्या कार्यवाहीच्या संदर्भातील प्राधिकरणे मुंबई पोलीस असून अपिलार्थी यांना प्रथम अपीलीय अधिकारी कार्यकारी अभियंता पदनिर्देशित अधिकारी (इ व का) एम/पश्चिम विभाग यांनी पारीत केलेले आदेशामध्ये योग्य अशी सूचना देखील करण्यात आलेली आहे. ही वस्तुस्थिती लक्षात घेता, प्रस्तुत अपिल निकाली काढून नस्ती बंद करण्यात येत आहे.

**आदेश**

**वरील अपिल निकाली काढण्यात येत आहे.**

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : १८.०६.२०२५**

**( राहुल पांडे )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

State Information Commission
Maharashtra